# अर्ज निशाणी १८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ आणि आदेश १ नियम १० अनुसार दाखल केला आहे. अर्जातील कथन की प्रस्तुतचा दावा वाद जमिनीची मोजणी करुन हद्दीखुणा कायम करुन मिळण्याकरिता तसेच प्रतिवादी यांच्याविरुद्ध निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. पुढे अर्जातील कथन की, गट क्रमांक ५१ चे संपुर्ण क्षेत्र १२ हे. ११ आर असून यामध्ये वादींसह प्रतिवादी आणि इतर ९ लोकांचे जमिनी आहेत. दाव्याचे स्वरुप पाहता इतर ९ लोकांना वादपत्रामध्ये प्रतिवादी म्हणून समाविष्ठ करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वादपत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी असावी अशी विनंती केली आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादींनी त्यांचे लेखी म्हणणे निशाणी क्रमांक २० अनुसार दाखल करुन अर्ज मंजुर करण्यास विरोध दर्शविला आहे.

३. उभय पक्षांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. उभय पक्षांचे कथनावरुन खालीलप्रमाणे मुद्दे काढुन त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदविण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय? | होय |
| २ | कोणता आदेश? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ व २ करिता

५. संचिकेचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वाद जमिनीची मोजणी करुन हद्दीखुणा कायम करुन मिळण्याकरिता तसेच प्रतिवादी यांच्याविरुद्ध निरंतर मनाई

हुकूम मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. पुढे असे दिसून येते की, गट क्रमांक ५१ चे एकुण क्षेत्र १२ हे. ११ आर असून यामध्ये वादी व प्रतिवादी यांच्यासह इतर ९ लोकांच्या जमिनी आहेत. वादपत्रात अर्जात सुचविलेले इतर ९ लोकांना पक्षकार करण्यात आलेले नाही. दाव्याचे स्वरुप पाहता गट क्रमांक ५१ मधील इतर ९ लोक देखील आवश्यक पक्षकार आहेत. प्रस्तुत अर्ज मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही सबब, वादींच्या मागण्यानुसार अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्याअनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज **निशाणी क्रमांक १८ मंजुर करण्यात आला.**

२. प्रस्तुत अर्जात सुचविलेली दुरुस्ती वादीने आजपासून आठ दिवसांच्या आत करुन दुरुस्त प्रत सादर करावी.

३. अर्जात सुचविलेले पक्षकार यांना दाव्यात प्रतिवादी क्रमांक २ ते १० म्हणून समाविष्ठ करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.03.13 16:48:52 +0530

दिनांकः-१३.०३.२०२६

( **अ. अ. शेख** )

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 13-03-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 13-03-2026 |
| Order uploaded on | - | 13-03-2026 |